दिनांक 18/10/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.154

विषय – नगरपरिषद हद्दीतील बाजार वसुलीचे दर निश्चित करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1)मा.मुख्याधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक यांची दिनांक 16/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 272.

विटा नगरपरिषद हद्दीत भाजीविक्रेते / किरकोळ व्यवसायिक आपला शेतीमाल विक्री करण्यासाठी / व्यवसाय करण्यासाठी नगरपरिषद हद्दीतील जागेचा (भाजी मंडई, रस्ते) वापर करीत असतात. याकामी दैनंदिन बाजार/आठवडी बाजार या दिवशी नगरपरिषदेच्या मालकीचे ओटे/कट्टे, खाद्य विक्री स्टॉल, फळ विक्रेते, फेरीवाले, खाटधारक यांचेकडून बाजार फी वसुली केली जाते. विटा नगरपरिषदेचे सध्याचे बाजार वसुलीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | तपशिल | दर र.रु. |
|---|---|---|
| 1 | नगरपरिषदेच्या मालकीचे ओटे | 10/- |
| 2 | १ ते ३ पाटीधारक | 10/- |
| 3 | ४ च्या पुढील पाटीधारक | 20/- |
| 4 | फळ विक्रेते धारक | 20/- |
| 5 | खाट धारक | 20/- |
| 6 | हातगाडे धारक | 20/- |
| 7 | खाद्य स्टॉल / गाडे | 20/- |
| 8 | टेम्पो धारक | 20/- |

विटा नगरपरिषदेने बाजार फी वसुलीकामी मागील अंदाजे 10 वर्षापासून कोणतीही फी वाढ केलेली नाही. संदर्भ क्र. 2 अन्वये नगरपालिकेस वसुली फी वेळोवेळी ठरविण्यात येईल असे नमूद आहे.

तरी विटा नगरपरिषदेच्या बाजार वसुलीच्या दरात वाढ केल्यास नगरपरिषदेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. इतर नगरपरिषदांच्या दरांच्या सरासरीचा विचार करता विटा नगरपरिषदेसाठी बाजार वसुली साठी वाढीव दर खालीलप्रमाणे प्रस्तावित करणे योग्य वाटते.

पान नं. 2 वर

| अ.क्रं. | तपशिल | दर र.रु. |
|---|---|---|
| 1 | मोकळी जागा 5 फुट x 5 फुट | 10/- |
| 2 | 5 फुट x 5 फुट पेक्षा जास्त असल्यास | 20/- |
| 3 | फळ विक्रेते धारक | 30/- |
| 4 | खाट धारक | 30/- |
| 5 | हातगाडे धारक | 30/- |
| 6 | खाद्य स्टॉल / गाडे | 30/- |
| 7 | 3 / 4 चाकी गाडीतून माल विक्रेते | 30/- |

तरी सदर वरील प्रस्तावित दरवाढीस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 18/10/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.155

विषय – विटा नगपरिषद अंतर्गत येणा-या सर्व शाळांचे वीज बिल अदा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अभियंता यांची दिनांक 17/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) प्रशासन अधिकारी नगरपरिषद शिक्षण मंडळ यांचेकडील दिनांक 16/10/2023 रोजीचे पत्र.

विटा नगरपरिषद अंतर्गत एकूण 19 शाळा आहेत. नगरपरिषद अंतर्गत शाळांची वीज बिले हे अनेक दिवसांपासून थकित आहेत. याबाबत शिक्षण मंडळाकडून नगपरिषद शाळांची वीज बिले भरणेबाबत संदर्भ क्रमांक 2 नुसार विनंती केली आहे. नगरपरिषद अंतर्गत येणा-या शाळांची वीज बिले वेळोवेळी अदा न केलेमुळे थकीत आहेत.

तरी विटा नगरपरिषद अंतर्गत येणा-या सर्व शाळांची थकीत वीज बिले व इथून पुढे येणारी सर्व वीज बिले अदा करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा